# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    डी.सी.आर.    दिनांक ३०/०५/२०१८**

## वाहन /रस्ते अपघातातल जखमींना मदत करणाऱ्या व्यक्ती/संस्था /समुह यांना बक्षिस देणेबाबत

महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे शासन निणर्य क्रमांक कपासु/०८१३/प्र.क्रं.४६२/पोल-८ दिनांक २५/०२/२०१४ ची अन्वये वाहन/रस्ते अपघातातील जखमींना मदत करणाऱ्या व्यक्ती/संस्था/समुह यांना बक्षिस देणेबाबत शासन निणर्य निर्गमीत करण्यात आले आहे.

राज्यात दर वर्षी मोठया प्रमाणात वाहन अपघात होतात. त्यामध्ये साधारणपणे दरवर्षी तेरा हजार लोकांचा मृत्यु होतो व सरासरी ४५ हजार लोक जखमी होतात. अपघातातील जखमींना वैद्यकीय व इतर मदत तातडीनेन मिळाल्यामुळे अनेकांना प्राण गमवावे लागतात व त्यांची कुटूंबे उध्वस्त होतात. त्यामुळे अपघातातील जखमींना मदत करणाऱ्या तसेच जखमीना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात घेवुन जाणाऱ्या नागरिक, संस्थांना खालील प्रमाणे बक्षिस देवून त्यांचा गौरव  करण्याबाबत महाराष्ट्र शासन गृह विभागाने संदर्भीय शासन निर्णय पारीत केला आहे.

### शासन निर्णय :-

वाहन/रस्ते अपघातातील जखमींना मदत करणाऱ्या, जखमीचे प्राण वाचविण्याकरीता, त्यांना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात घेवुन जाणाऱ्या, व्यक्ती/संस्था/समुह यांना मा.मंत्री (गृह)यांच्याकडील रेसकोर्स निधीतून खालीलप्रमाणे बक्षिसे देण्यास शासन या आदेशाद्वारे मंजुरी दिली आहे.

१) प्रथम बक्षिस रुपये १,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार रुपये)

२) दुसरे बक्षिस रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख)

३) तिसरे बक्षिस रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार रुपये)

पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस, जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच शहर पोलीस आयुक्तालयातील वाहतुक शाखेचे प्रमुख हे अपघातग्रस्तांना संबंधीत व्यक्ती/ संस्था /समुह यांनी केलेल्या मदतीसंदर्भात त्यांनी बक्षिस देण्याबाबतचा प्रस्ताव अपघात घडल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत शासनास सादर करतील. त्यानंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. शासन स्तरावर जानेवारी ते डिसेंबर या कालावधीत प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर त्या पुढील वर्षाच्या मार्च अखेरपर्यंत निर्णय घण्यात येईल.

नांदेड जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी वरील बक्षिसाबाबतची माहिती आपल्या पोलीस स्टेशन मध्ये प्रसिध्दी करुन लोकांना याबाबतची सविस्तर माहिती दयावी. अपघातग्रस्तांना संबंधीत व्यक्ती/संस्था/समुह यांनी केलेल्या मदती संदर्भात त्यांना बक्षिस देण्याबाबतचा प्रस्ताव अपघात घडल्यापासून पंधरा दिवसाच्या कालावधीत पोलीस अधीक्षक कार्यालय येथे सादर करतील यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

**(चंद्र किशोर मीणा)**
पोलीस अधीक्षक, नांदेड.

# **नांदेड जिल्हयामध्ये "नो हॉर्न " डे साजरा करण्या बाबत.**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक टिआरए ०९१७/११९८/प्र.क्र./२६२/पोल ८, दिनांक ०३.१०.२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमीत करण्यात आले आहे.

सदरील शासन निर्णयात नाशिक पोलीस आयुक्तालयामार्फत दिनांक २४/०४/२०१७ पासुन दर सोमवारी **" नो हॉर्न डे "** साजरा केला जात आहे. सदर संकल्पनेस नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असुन ध्वनी प्रदुषण कमी करण्यासाठी पोलीस वाहन चालक यांच्या उत्स्फुर्त प्रतिसादाने ही संकल्पना नाशिक शहरात यशस्वीपणे राबविला जात आहे. राज्यातील इतर पोलीस आयुक्तालये तसेच ग्रामीण पोलीसांमार्फत सदर संकल्पना राबविली गेल्यास ध्वनी प्रदुषणाच्या दुष्टपरिणामांबाबत प्रोत्साहित करावे असे निर्देष मा. राज्यमंत्री गृह (शहरे) यांनी दिलेले आहेत.

सदर संकल्पना राबविली गेल्यास ध्वनी प्रदुषणाच्या दुष्टपरिणामांबाबत मोठया प्रमाणात जनजागृती हाऊन वाहन चालकांना त्याबाबत अधिकाधिक जागृत करण्यात येईल . नांदेड शहरात वाहनामध्ये वेगवेगळया प्रकारच्या आधुनिक **" एअर हॉर्न "** वापरामुळे ध्वनी प्रदुषणात मोठी वाढ झाल्याचे जाणवत आहे. कायद्याने निर्माण केलेले **" सायलन्स झोन " आणि " नो हॉर्न झोन "** सारख्या संकल्पना शहरात अस्तित्वात नाहीत असे दिसते . ज्या ठिकाणी **" सायलन्स झोन "** होते त्या ठिकाणी कुठेचे तसा उल्लेख दिसुन येत नाही. म्हणुन ध्वनी प्रदुषणात वाढ झाली असल्याचे दिसुन येते.

त्या अनुषंगाने नांदेड शहरात दिनांक ०१.०६.२०१८ पासुन दर सोमवारी **" नो हॉर्न डे "** साजरा केला जात आहे. सदर संकल्पनेस नांदेड जिल्हयातील जास्तीत जास्त नागरिकांचा प्रतिसाद मिळण्यासाठी सविस्तर प्रसिध्दी करुन पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी जातीने लक्ष देवुन नागकिंना त्याबाबत होणाऱ्या फायदया बाबत सविस्तर मार्गदर्शन करुन सदरील योजना यशस्वी करण्यासाठी दर सोमवारी **" नो हॉर्न डे "** साजरा करण्यात यावा.

**(चंद्र किशोर मीणा)**
पोलीस अधीक्षक, नांदेड.